दिनांक 04/05/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.14

विषय – श्री भैरवनाथ यात्रा व विटा फेस्टीवलनिमित्त विटा नगरपरिषद विटा व मी फिनीक्स यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम आयोजीत केलेबाबतचा खर्च अदा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 03/05/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराने मागील 5 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे.

त्याअनुषंगाने श्री भैरवनाथ यात्रा व विटा फेस्टीवलनिमित्त विटा नगरपरिषद विटा व मी फिनीक्स यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम आयोजीत करणे आवश्यक होते. या कार्यक्रमामध्ये विटा शहरातील हजारो नागरीकांची उपस्थिती असलेने विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान अंतर्गत विविध उपक्रमांची माहिती नागरीकांना पोहोचणार आहे. सदर कार्यक्रमचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान साठी होणार आहे. सदर कार्यकममध्ये विविध स्पर्धा आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. त्यासाठी ट्रॉफी, सर्टिफिकेटची आवश्यकता होती. सदर ट्रॉफी, सर्टिफिकेट कामी र.रू.24000/- इतका खर्च आलेला आहे. तरी सदर कामाची र.रू.24000/- नगरपरिषदेमार्फत मिळणेबाबत मी फिनिक्स ॲडव्हरटायझिंग कंपनी विटा यांनी दिनांक 10/04/2023 रोजीचे अर्जाने विनंती केली आहे.

तरी श्री भैरवनाथ यात्रा व विटा फेस्टीवलनिमित्त विटा नगरपरिषद विटा व मी फिनीक्स यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान अंतर्गत विटा नगरपरिषदेमार्फत ट्रॉफी, सर्टिफिकेटसाठी र.रू.24000/- मी फिनिक्स ॲडव्हरटायझिंग कंपनी विटा यांना अदा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा